...आदिवासी सातपुडा शिक्षण प्रसारक मंडळ...

महाराज ज. पो. वळवी कला, वाणिज्य व श्री वि. कृ. कुलकर्णी विज्ञान महाविदयालय

धडगाव, ता. अक्राणी (जिल्हा. नंदुरबार)- 425414

राष्ट्रीय सेवा योजना

डॉ. सुनील एकनाथ शिंदे

(कार्यक्रमअधिकारी, रा. से. यो. विभागा)

PH : (02595) 220396

Twiter Ac. : @MjpvN

FAX : (02595) 220396

Mobile No : 09021515358

E-Mail : sunilshinde1684@gmail.com

NOT ME BUT YOU

डॉ. संजय गायकवाड

(प्राचार्य)

PH : (02595) 220396

FAX : (02595) 220396

E-Mail : mjpvascdhadgaon@rediffmail.com

जावक :- FM/NSS/02/ /२०२२-२३ दिनांक :-03/ 02/2023

# अहवाल (2022-2023)

## विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर "युवकांचा ध्यास, ग्राम-शहर विकास"

कवयित्री बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव व महाराज जनार्दन पोहऱ्या वळवी कला वाणिज्य व श्री विष्णू कृष्ण कुलकर्णी विज्ञान महाविद्यालय, धडगाव जि. नंदुरबार यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर मौजे. उमराणी बु. ता. धडगाव जि. नंदुरबार येथे **"युवकांचा ध्यास, ग्राम-शहर विकास"** या ब्रीद वाक्याने शुक्रवार दिनांक 27/01/2023 ते गुरुवार दिनांक 02/02/2023 संपन्न झाले.

**<u>पहिला दिवस</u>: शुक्रवार, दिनांक 27/01/2023**

### उद्घाटन समारंभ

आज दिनांक 27/01/2023 रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव व महाराज. ज. पो. वळवी कला, वाणिज्य व श्री. वि. कृ. कु. विज्ञान महाविद्यालय, धडगावच्या राष्ट्रीय सेवा योजना एकका द्वारे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचा उद्घाटन समारंभ उमराणी. बु. येथे संपन्न झाला. या कार्यक्रमाचे उद्घाटन मा. फकीरा पाडवी (माजी

सैनिक) त्यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गायकवाड हे होते. तसेच प्रमुख पाहुणे रतिलाल महाले (तालुका कृषी अधिकारी), मा. विठ्ठल कदम, सौ. आशाताई पावरा (सरपंच उमराणे), फत्तेसिंग पावरा (सा. कार्यकर्ते), तानाजी पावरा, (पोलीस पाटील), मा. श्री. विशाल पावरा (सा. कार्यकर्ते) व गावातील जेष्ठ नागरिक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे उद्घाटक मा. फकीरा पाडवी यांनी आपल्या मनोगत व्यक्त करताना सांगितले की, "युवकांनी देशासाठी आपले सर्वस्वी अर्पण करावे". कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते रतिलाल महाले यांनी "कृषी क्षेत्रात युवकांना रोजगाराची संधी" याविषयी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच प्रमुख पाहुणे विठ्ठल कदम यांनी "बालविवाह कायद्याने गुन्हा आहे यावर शपथ देऊन विद्यार्थ्यांना बालविवाह कायद्याची माहिती दिली". तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. संजय गायकवाड यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना एन.एस.एस. च्या सर्व स्वयंसेवकांना सात दिवसीय विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिरासाठी शुभेच्छा दिल्या व कार्यक्रमाची यशस्वी सुरुवात झाली हे जाहीर केले. या उद्घाटन कार्यक्रमात दत्तक गाव उमराणी बु. येथे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांच्या निदर्शनानुसार "**कवयित्री बहिणाबाई ग्रामवाचक कट्टा**" सुरू करण्यात आले, त्यासाठी जवळपास 100 पुस्तके भेट म्हणून देण्यात आले हे सदर पुस्तके गावातील मा. सौ आशाताई पावरा, (सरपंच) यांनी स्वीकार केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ सुनील शिंदे यांनी केले त्यांनी प्रास्ताविकामध्ये सात दिवस शिबिरात जे विविध उपक्रम बौद्धिक, श्रमदान, व्यायाम, इत्यादी विषयी माहिती दिली तसेच या शिबिरामध्ये तीन आरोग्य तपासणी शिबिर होणार आहे. जनजागृती पर पथनाट्य सादर करणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अशोक राठोड यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रा. डॉ. एस. आर महाले यांनी मानले, बौद्धिक सत्रामध्ये पहिले व्याख्यान श्री रतिलाल सिताराम महाले, (तालुका कृषी अधिकारी), यांनी "शेती विषयक कृषी विभागाच्या विविध योजना" या विषयावर मार्गदर्शन केले.

तसेच दुसरे व्याख्यान डॉ. एम. एच. पाटील, (महाराज जनार्दन पो. वळवी महाविद्यालय, धडगाव) यांनी “युवक आणि रोजगार” या विषयावर मार्गदर्शन केले. यानंतर जनजागृती पर पथनाट्य सादर करण्यात आले. त्यानंतर मैदानी खेळ व गटचर्चा करण्यात आली रात्रीचे भोजन, सामाजिक विचार मंथन, व दैनंदिन लिखाण, प्रार्थना, दीपमालवण इत्यादी दैनंदिनी नुसार व कार्यक्रम पत्रिकेनुसार प्रथम दिवसाचा कार्यक्रम संपन्न झाला.

**<u>दुसरा दिवसदिवस</u>: शनिवार, दिनांक 28/01/2023**

सकाळी जागर त्यानंतर प्रार्थना, योगा, ध्यानवर्ग व एरोबिक इत्यादी झाल्यानंतर चहा आणि अल्पोपहार केल्यानंतर उमराणी बु. येथे श्रमदान म्हणून “गाडगे महाराज स्वच्छता अभियान” अंतर्गत गावातील पूर्ण स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. दुपारच्या भोजनानंतर, बौद्धिक सत्रामध्ये पहिले व्याख्यान श्री संतोष पावरा, (आदिवासी साहित्यिक कवी, शहादा) यांनी “इंडिया मधून भारत निर्माण करण्यात आदिवासी विद्यार्थ्यांची भूमिका” या विषयावर आपले विचार व्यक्त केले. दुसरे व्याख्यान प्रा. राजू पवार, (महाराज जनार्दन पो. वळवी महाविद्यालय, धडगाव) यांनी “भारतीय संविधान समज गैरसमज” या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. बौद्धिक सत्रानंतर चहापाणी घेतले व त्यानंतर जनजागृती पर पथनाट्य सादर करण्यात आले. संध्याकाळी मैदानी खेळ व गटचर्चा रात्रीचे भोजन, सामाजिक विचार मंथन व दैनंदिन लिखाण, प्रार्थना, दीपमालवण, इत्यादी दिवसभर कार्यक्रम संपन्न झाले.

**<u>तिसरा दिवस</u>: रविवार, दिनांक 29/01/2023**

सकाळी जागर त्यानंतर प्रार्थना, योगा, ध्यानवर्ग व एरोबिक झाल्यानंतर चहा आणि अल्पोपहार त्यानंतर उमराणी बु. येथे वल नदीवरती श्रमदानातून वनराई बंधारा बांधण्यात आला.या बंधाऱ्यासाठी 300 गोण्याचा वापर झाला. या वनराई बंधाऱ्यामुळे 1 टीबी / 10000 लिटर पेक्षा जास्त पाणी साठवण्याची क्षमता असलेला बंधारा बांधण्यात आला. या बंधाऱ्याचा

फायदा उन्हाळ्यामध्ये गावातील लोकांना शेतीसाठी व पिण्याच्या पाण्यासाठी आणि विशेषता गुरांसाठी पिण्याच्या पाण्यासाठी देखील होणार आहे. स्वयंस्वच्छता नंतर भोजन व विश्रांती घेण्यात आली. दुपारच्या सत्रात रोहित ऑप्टिकल, धडगाव रोहिदास पावरा यांच्याकडून नेत्र तपासणी शिबिरचे आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात जवळपास 100 रुग्णावर उपचार व तपासणी करण्यात आली. त्यात 08 रुग्णांना मोतीबिंदू ची लक्षणे दिसून आली. तरी ज्या रुग्णांना मोतीबिंद होता त्यांची शस्त्रक्रिया कांतालक्ष्मी शहा नेत्र रुग्णालय, नंदुरबार येथे मोफत शस्त्रक्रिया करण्यात येईल असे रोहिदास पावरा यांनी त्या रुग्णांना सांगितले, बौद्धिक सत्रामध्ये पहिले व्याख्यान गुसायडा भील यांनी “व्यसनमुक्ती” या संदर्भात मार्गदर्शन केले. दुसरे व्याख्यान विठ्ठल कदम, माजी अध्यक्ष, बालहक्क समिती, नंदुरबार यांनी “बालविवाह कायदा” याविषयावर मार्गदर्शन केले. तसेच निलेश पावरा, या विद्यार्थी स्वयंसेवकांनी “आपत्ती व्यवस्थापन” यावर आधारित प्रात्यक्षिके सादर केली. चहा नंतर जनजागृती पर पथनाट्य सादर करण्यात आले. त्यानंतर मैदानी खेळ व गटचर्चा, रात्रीचे भोजन, सामाजिक विचार मंथन व दैनंदिन लिखाण, प्रार्थना, दीपमालवण इत्यादी उपक्रमातून शिबिराचा तिसरा दिवसाचे सत्र संपले.

**<u>चौथा दिवस</u>: सोमवार, दिनांक 30/01/2023**

सकाळी जागर त्यानंतर प्रार्थना, योगा, ध्यानवर्ग व एरोबिक झाल्यानंतर चहा आणि अल्पोपहार त्यानंतर उमराणी बु. गावामध्ये श्रमदान उपक्रमात गावातील प्लास्टिक निर्मूलन या उपक्रमानुसार प्लास्टिकचे साहित्य गोळा करण्यात आले. तसेच गावामध्ये बालविवाह जनजागृती आणि मतदान जनजागृती पर रॅली काढण्यात आली. स्वयंस्वच्छता त्यानंतर भोजन व विश्रांती नंतर सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला, बौद्धिक सत्रामध्ये मा. विठ्ठल कदम यांनी प्रश्नमंजुषा हा कार्यक्रम घेतला त्यानुसार विद्यार्थ्यांना बॉक्समध्ये प्रश्न टाकायला सांगितले. येथील आदिवासी विद्यार्थी हे बोलण्यासाठी लाजतात तरी त्यांच्या मनातील समस्या या प्रश्न ते लिखित

स्वरूपात त्या बॉक्समध्ये टाकतील असे सुचविण्यात आले त्यानुसार एकूण 47 प्रश्न हे त्या बॉक्समध्ये टाकण्यात आले होते. या प्रश्नांची उत्तरे विठ्ठल कदम आणि प्रा. आर. जी. पवार यांनी देऊन मुलांचे समाधान केले व शंका दूर केल्या. दुसरे व्याख्यान श्री गुणवंत पाटील, (पाणी फाउंडेशन, शहादा) यांनी “जल नियोजन आणि व्यवस्थापन” या विषयावर मार्गदर्शन केले. चहा नंतर जनजागृती पर पथनाट्य सादर करण्यात आले. त्यानंतर मैदानी खेळ, गटचर्चा, रात्रीचे भोजन, सामाजिक विचार मंथन, दैनंदिन लिखाण, प्रार्थना, दीपमालवण इत्यादी कार्यक्रमातून राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा चौथा दिवस आनंदात व उत्साहात संपन्न झाला.

**पाचवा दिवस: मंगळवार, दिनांक 31/01/2023**

सकाळी जागर त्यानंतर प्रार्थना, योगा, ध्यानवर्ग व एरोबिक झाल्यानंतर चहा आणि अल्पोपहार त्यानंतर उमराणी बु. गावामध्ये श्रमदानतुन गावाची स्वच्छता करण्यात आली मुलांना शेती विषयक आवड निर्माण व्हावी व शेतीची माहिती व्हावी यासाठी एका शेतात स्वच्छता व शेतीचे काम करण्यात आले. नंतर स्वयंस्वच्छता त्यानंतर भोजन व विश्रांतीनंतर दुपारी धनाजे (पी.एस.सी.) मधील डॉ. दिनेश वळवी, डॉ. कलावती पावरा, डॉ. गोपाल बडगुजर, वर्षा गवळी, राकेश पावरा, प्रवीण ब्राम्हणे यांच्यामार्फत आरोग्य तपासणी शिबिर राबवण्यात आले. या शिबिरात गावातील 150 लोकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवकांची उंची, वजन, आणि हिमोग्लोबिन ची तपासणी केली आणि गावातील लोकांची उंची, वजन, मधुमेह, रक्तदाब, आणि वेगवेगळ्या आजाराची तपासणी करून निदान करून त्यावरती औषध, दवा गोळ्याचे वाटप करण्यात आले. बौद्धिक सत्रामध्ये पहिले व्याख्यान डॉ गोपाल बडगुजर, यांनी (समुदाय आरोग्य अधिकारी, धनाजे) “कोविड काळात योगाचे महत्त्व” या विषयावर मार्गदर्शन केले. दुसरे व्याख्यान सौ. सुरेखा परमार यांनी विशेष मुलींसाठी “मुलींची स्वच्छता आणि स्वास्थ” या विषयावर मार्गदर्शन केले. तिसरे व्याख्यान मा. संजय पावरा, यांनी

“राष्ट्रीय शिक्षण हक्क कायदा” या विषयावर मार्गदर्शन केले चौथे व्याख्यान श्री तात्याजी पवार, (विचारधारा फाउंडेशन, शहादा) यांनी “मतदान काळाची गरज” या विषयावर मार्गदर्शन केले. चहा नंतर जनजागृती पर पथनाट्य सादर करण्यात आले. त्यानंतर मैदानी खेळ, गटचर्चा, रात्रीचे भोजन, सामाजिक विचार मंथन, दैनंदिन लिखाण, प्रार्थना, दीपमालवण अशाप्रकारे शिबिराच्या पाचव्या दिवशी दिवसभर व्याख्याने, आरोग्य तपासणी, पथनाट्य इत्यादी कार्यक्रम घेऊन संपन्न झाला.

**<u>सहावा दिवस</u>: बुधवार, दिनांक 01/02/2023**

सकाळी जागर त्यानंतर प्रार्थना, योगा, ध्यानवर्ग व एरोबिक झाल्यानंतर चहा आणि अल्पोपहार त्यानंतर उमराणी बु. दत्तक गावामध्ये श्रमदाना मध्ये गावातील नदीमध्ये जे कचरा, घाण, व शेवाळ होते तर नदीतील पात्र स्वयंसेवकामार्फत स्वच्छ करण्यात आले. नंतर **धडगाव पंचायत समितीचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. निलेश जोगदंड आणि डॉ. राजपाल पावरा उपस्थित होते. त्यात ग्रामस्थांनी शेळी, गाय, बैल इत्यादी प्राण्याची तपासणी करण्यात आली. त्यांना लसीकरण करून डोस पाजण्यात आले. ग्रामपंचायत उमराणी येथे राष्ट्रीय सेवा योजना मार्फत हा उपक्रम राबविल्यामुळे ग्रामस्थांनी व पशुवैद्यकीय विभागाने राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे धन्यवाद व्यक्त केले. असा नाविन्यपूर्ण उपक्रम म्हणजे खरोखर “युवकांचा ध्यास ग्राम- शहर विकास” हे ब्रीद शाश्वत होताना दिसून आले**. दुपारी भोजन व विश्रांतीनंतर सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. बौद्धिक सत्रामध्ये पहिले व्याख्यान डॉ. भूषण अत्रे, (शाखाधिकारी, भारतीय स्टेट बँक, धडगाव) यांनी “नेट बँकिंग चे फायदे” या विषयावर मार्गदर्शन केले. दुसरे व्याख्यान शिवाजी पावरा, (रावल महाविद्यालय, दोंडाईचा) यांनी “व्यक्तिमत्व विकास” या विषयावर मार्गदर्शन केले. चहा नंतर जनजागृती पर पथनाट्य सादर करण्यात आले. त्यानंतर मैदानी खेळ, गटचर्चा, रात्रीचे 8.00 वाजता क.ब.चौ. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे

संचालक मा. प्रा. डॉ. सचिन नांद्रे, प्रा. डॉ. विजय पाटील (रा से यो, जिल्हा समन्वयक, नंदुरबार), प्रा. डॉ. विशाल करपे (रा से यो समन्वयक, नंदुरबार विभाग) यांनी भेट दिली. तेव्हा मा. प्रा. डॉ. सचिन नांद्रे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व शिबिराविषयी सूचना केलेल्या. तसेच प्रा. डॉ. विशाल करपे यांनी विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे महत्त्व सांगून मौलिक मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. विजय पाटील आपले मनोगत व्यक्त करताना राष्ट्रीय सेवा योजनेचे विविध उपक्रम आणि विशेष विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे हे भावी आयुष्यासाठी महत्त्वपूर्ण असून यात आपले व्यक्तिमत्व विकसित होते अशी महत्वपूर्ण माहिती त्यांनी दिली. रात्रीचे भोजन, सामाजिक विचार मंथन, दैनंदिन लिखाण, प्रार्थना, दीपमालवण अशाप्रकारे शिबिराच्या सहाव्या दिवशी दिवसभर व्याख्याने, आरोग्य तपासणी, पथनाट्य इत्यादी कार्यक्रम घेऊन संपन्न झाला.

**<u>सातवा दिवस</u>: गुरुवार, दिनांक 02/02/2023**

## निरोप समारंभ

सकाळी जागर त्यानंतर प्रार्थना, योगा, ध्यानवर्ग व एरोबिक झाल्यानंतर चहा आणि अल्पोपहार झाल्या नंतर उमराणी बु. गावामध्ये श्रमदान करण्यात आले. स्वयंस्वच्छते नंतर गावात नागरिकांचा सामाजिक व आरोग्यदायी सर्व्हे करण्यात आला. विद्यार्थ्यांचा सर्व्हेचा अहवाल व माहिती धनाजे, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय विभागास देण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजना विभाग एकका द्वारे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचा निरोप समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्रा. एन. पी. विभांडीक हे उपस्थित होते. तसेच कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मनीषा तीरमाली (वन विभाग), प्राचार्य संजय गायकवाड, प्रा. शिवाजी पावरा, अपसिंग पावरा, प्रा. आर. जी. पवार हे उपस्थित होते. प्रा. शिवाजी पावरा, तसेच सौ आशाताई पावरा (सरपंच), फत्तेसिंग पावरा, तानाजी पावरा, (पोलीस पाटील), विशाल अपसिंग

पावरा, जगदीश पावरा व गावातील जेष्ठ नागरिक उपस्थित होते. शिबिराच्या शेवटच्या दिवशी समारोपीय कार्यक्रमात स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी सात दिवसाचा शिबिरातील अनुभव व्यक्त केला. त्यांनी रा से यो शिबिरात सहभाग घेतल्यामुळे त्यांना स्वावलंबी होण्याचे धडे मिळाले. तसेच विविध मान्यवरांनी बौद्धिक क्षेत्रात सखोल माहिती दिली. त्यामुळे नवनवीन विषयातील माहिती प्राप्त झाल्याबद्दल त्यांना समाधान मिळाले. तसेच योगा, ध्यानवर्ग आणि एरोबिक हे निरोगी आरोग्यासाठी महत्त्वाचे आहे ही नवीन माहिती त्यांना मिळाली रा से यो शिबिरातून ज्ञानाची शिदोरी ही भावी आयुष्यासाठी निश्चितच उपयोगी येईल, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. निरोप समारंभामध्ये विविध पारितोषिक देण्यात आले त्यामध्ये उत्कृष्ट स्वयंसेवक निलेश वळवी, उत्कृष्ट स्वयंसेविका प्रियंका पाडवी यांना दोनशे रुपये आणि टी-शर्ट बक्षीस म्हणून देण्यात आले. उत्कृष्ट ग्रुप म्हणून भगवान बिरसा मुंडा या ग्रुपची निवड करण्यात आली व त्यांना पाचशे रुपये रोख रक्कम बक्षीस म्हणून देण्यात आली. शिबिरामध्ये प्रत्येक दिवशी जनजागृती पर पथनाट्य गावकरी लोकांसमोर सादर करण्यात आले त्यातील व्यसनमुक्ती हे पथनाट्य सर्वोत्कृष्ट म्हणून निवडण्यात आले. त्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभाग कडून पाचशे रुपये रोख रक्कम बक्षीस म्हणून देण्यात आली. आणि सर्व विजेत्यांना राशीमा फाउंडेशन अध्यक्ष प्रा. शिवाजी पावरा यांच्याकडून कडून इंग्रजी व्याकरण पुस्तक सप्रेम भेट देण्यात आलं. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. एन. पी. विभांडीक यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात एन.एस.एस. च्या सर्व स्वयंसेवकांना सात दिवसीय विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल शुभेच्छा दिल्या व शिबिरातील सर्व कार्य पूर्ण झाले असे जाहीर केले. या शिबिरामध्ये ध्यानवर्ग प्रा. आर. जी. पवार सर यांनी घेतलं आणि एरोबिक्स एक्सरसाइज राकेश पावरा सर यांनी घेतल्या तसेच योगासने महेश कोळपकर सर यांनी घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अशोक राठोड यांनी केले तर

कार्यक्रमाचे आभार प्रा. कल्पना साळवे मॅडम यांनी मानले. चहा नंतर जनजागृती पर पथनाट्य सादर करण्यात आले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव व महाराज जनार्दन पोहऱ्या वळवी कला वाणिज्य व श्री विष्णू कृष्ण कुलकर्णी विज्ञान महाविद्यालय, धडगाव जिल्हा नंदुरबार यांच्या संयुक्त विद्यमानाने मौजे उमराणी बु. येथे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर **"युवकांचा ध्यास, ग्राम-शहर विकास"** या संकल्पनेवर आधारित शिबिर दि. 27/01/2023 ते 02/02/2023 या कालावधीत संपन्न झाले रा से यो शिबिराचा अहवाल सादर करत आहेत. तरी अहवालचा स्वीकार करावा ही नम्र विनंती.

धन्यवाद.

डॉ. सुनील एकनाथ शिंदे
रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी
म.ज.पो.व.कला, वाणिज्य
व श्री वि.कृ.कु.विज्ञान महाविद्यालय
धडगाव,जि.नंदुरबार.

प्राचार्य
महाराज ज.पो वळवी कला,वाणिज्य व
श्री वि कृ कुलकर्णी विज्ञान महाविद्यालय
धडगाव ता.अक्राणी जि.नंदुरबार (म.रा

## विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर "युवकांचा ध्यास, ग्राम-शहर विकास" उद्घाटन समारंभ










राष्ट्रीय सेवा योजना
GPS Map Camera
Umarani Bk, Maharashtra, India
R6VH+F4H, Umarani Bk, Maharashtra
425414, India
Lat 21.843403°
Long 74.227623°
27/01/23 11:51 AM GMT +05:30
Google


राष्ट्रीय सेवा योजना
GPS Map Camera
Umarani Bk, Maharashtra, India
R6VH+F4H, Umarani Bk, Maharashtra
425414, India
Lat 21.843395°
Long 74.227592°
27/01/23 11:55 AM GMT +05:30
Google


राष्ट्रीय सेवा योजना
GPS Map Camera
Umarani Bk, Maharashtra, India
R6VH+F4H, Umarani Bk, Maharashtra
425414, India
Lat 21.843382°
Long 74.227663°
27/01/23 12:08 PM GMT +05:30
Google


राष्ट्रीय सेवा योजना
GPS Map Camera
Umarani Bk, Maharashtra, India
R6VH+F4H, Umarani Bk, Maharashtra
425414, India
Lat 21.843368°
Long 74.227598°
27/01/23 12:13 PM GMT +05:30
Google

# एरोबिक, योगा व ध्यानवर्ग







# बौद्धिक सत्र


राष्ट्रीय सेवा योजना
GPS Map Camera
Umarani Bk, Maharashtra, India
R6VH+F4H, Umarani Bk, Maharashtra
425414, India
Lat 21.843314°
Long 74.227648°
28/01/23 01:06 PM GMT +05:30
Google


राष्ट्रीय सेवा योजना
GPS Map Camera
Umarani Bk, Maharashtra, India
R6VH+F4H, Umarani Bk, Maharashtra
425414, India
Lat 21.84328°
Long 74.227538°
28/01/23 12:27 PM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Umarani Bk, Maharashtra, India
R6VH+F4H, Umarani Bk, Maharashtra
425414, India
Lat 21.8434°
Long 74.227663°
30/01/23 03:11 PM GMT +05:30
Google


राष्ट्रीय सेवा योजना
GPS Map Camera
Umarani Bk, Maharashtra, India
R6VH+F4H, Umarani Bk, Maharashtra
425414, India
Lat 21.843375°
Long 74.227582°
31/01/23 02:56 PM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Umarani Bk, Maharashtra, India
R6VH+F4H, Umarani Bk, Maharashtra
425414, India
Lat 21.843483°
Long 74.227631°
31/01/23 04:12 PM GMT +05:30
Google


राष्ट्रीय सेवा योजना
GPS Map Camera
Umarani Bk, Maharashtra, India
R6VH+F4H, Umarani Bk, Maharashtra
425414, India
Lat 21.843353°
Long 74.227705°
01/02/23 02:23 PM GMT +05:30
Google

# "गाडगे महाराज स्वच्छता अभियान"














# वनराई बंधारा







# आरोग्य तपासणी शिबिर









## बालविवाह आणि मतदान जनजागृती रॅली










निलेश पावरा, नी "आपत्ती व्यवस्थापन" यावर आधारित प्रात्यक्षिके सादर केली

## सांस्कृतिक कार्यक्रम व जनजागृती पर पटनाट्य









# प्रश्नमंजुषा कार्यक्रम










# “कवयित्री बहिणाबाई ग्रामवाचक कट्टा”









# नागरिकांचा सामाजिक व आरोग्यदायी सर्वे





# निरोप समारंभ


राष्ट्रीय सेवा योजना
विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर

राष्ट्रीय सेवा योजना
Not Me But You


राष्ट्रीय सेवा योजना

राष्ट्रीय सेवा योजना


राधेश्याम कुलथे
(९७६३९१६७६६)

लोकमत

# वळवी महाविद्यालयाच्या शिबिराचे उदघाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**ब्राह्मणपुरी :** धडगाव येथील महाराज ज. पो. वळवी कला, वाणिज्य व श्री. वि. कृ. कुलकर्णी विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे हिवाळी शिबिराचे उदघाटन उमराणी बुद्रूक येथे करण्यात आले.

शिबिराचे उदघाटन माजी सैनिक फकिरा पाडवी यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गायकवाड तर प्रमुख अतिथी म्हणून तालुका कृषी अधिकारी रतिलाल महाले, विठ्ठल कदम, सरपंच आशाबाई पावरा, फत्तेसिंग पावरा, पोलिस पाटील तानाजी पावरा, विशाल पावरा उपस्थित होते. यावेळी फकिरा पाडवी, रतिलाल महाले, प्राचार्य डॉ. गायकवाड यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयातर्फे उमराणी येथे कवयित्री बहिणाबाई ग्रामवाचक कट्टा सुरू करण्यात आला असून त्यासाठी १०० पुस्तके देण्यात आले. यावेळी प्रा. डॉ. एस. आर. महाले, प्रा. आर. जी. पवार, प्रा. एन. पी. विभांडिक, प्रा. डॉ. मनोहर पाटील, प्रा. डॉ. हरिभाऊ पवार, प्रा. डॉ. विजयकुमार गोलेकर, प्रा. अनिल शिंदे, हर्षद पाडवी, योगेश पाटील, ईश्वर बाविस्कर, मनोज कुमार मीना उपस्थित होते. प्रा. डॉ. सुनील शिंदे यांनी शिबिरामध्ये तीन आरोग्य तपासणी शिबिर, नेत्र तपासणी शिबिर, गावातील जनावरांची वैद्यकीय तपासणी, पथनाट्य सादर होणार असल्याची माहिती दिली. सूत्रसंचालन प्रा. अशोक राठोड तर आभार प्रा. डॉ. एस. आर. महाले यांनी मानले.

Hello Nandurbar
Page No. 4 Jan 29, 2023
Powered by: erelego.com

राधेश्याम कुलथे
(९७६३९१६७६६)

लोकमत




उमराणी, ता.धडगाव येथे विद्यार्थ्यांनी श्रमदानातून बांधलेला वनराई बंधारा.

# रासेयो विभाग आणि कृषी विभागातर्फे वनराई बंधारा

लोकमत न्यूज नेटवर्क

**ब्राह्मणपुरी :** महाराज जनार्दन पोहऱ्या वळवी कला, वाणिज्य व विष्णू कृष्ण कुलकर्णी विज्ञान महाविद्यालय धडगावच्या रासेयो विभागाचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर उमराणी बुद्रूक येथे सुरू आहे.

शिबिरादरम्यान वल नदीवर वनराई बंधारा बांधण्यात आला. वनराई बंधारा बांधण्यासाठी कृषी सहायक वामन पावरा, विशाल पावरा आणि जगदीश पावरा यांची मदत झाली. बंधाऱ्यासाठी ३०० गोण्याचा वापर झाला. या वनराई बंधाऱ्यामुळे एक टीबी / १० हजार लिटरपेक्षा जास्त पाणी साठवण्याची क्षमता या बंधाऱ्यामध्ये आहे.

या बंधाऱ्याचा फायदा उन्हाळ्यामध्ये गावातील लोकांसाठी, शेतीसाठी व पिण्याच्या पाण्यासाठी आणि विशेषत: गुरांसाठी पाणी पिण्यासाठी होणार आहे. हा बंधारा बांधण्यासाठी विशेषत: राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सुनील शिंदे आणि राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांनी मेहनत घेतली.

Hello Nandurbar
Page No. 4 Feb 02, 2023
Powered by: erelego.com

# उमराणी बु । येथे रासेयो विभागाचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर




मोलगी : महाराज जनार्दन पोहऱ्या वळवी कला वाणिज्य व श्री विष्णु कृष्ण कुलकर्णी विज्ञान महाविद्यालय धडगाव महाविद्यालयाचे रासेयो विभागाचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर उमराणी बु. येथे सुरू आहे.

शिबीरा दरम्यान उमराणी बु. येथील वल नदीवरती वनराई बंधारा बांधण्यात आला. वनराई बंधारा बांधण्यासाठी वामन पावरा (कृषी सहाय्यक), विशाल पावरा आणि जगदीश पावरा आदी ग्रामस्थ्यांचे सहकार्यातून बंधारा सकारण्यात आला. बंधारा निर्मिती करिता एकूण ३०० गोण्याचा वापर झाला. या वनराई बंधाऱ्यामुळे १ टीबी/१०००० लिटर पेक्षा जास्त पाणी साठवण्याची क्षमता या बंधाऱ्यांमध्ये आहे. या बंधाऱ्यामुळे उन्हाळ्यामध्ये गावातील शेतीसाठी व पिण्याच्या पाण्यासाठी आणि विशेषता गुरांसाठी पाणी पिण्यासाठी होणार आहे. हा बंधारा बांधण्यासाठी विशेषता राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सुनील एकनाथ शिंदे आणि राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

पुण्य नगरी SMART नंदुरबार

# उमराणी येथे साकारला वनराई बंधारा



**तेलखेडी:** महाराज जनार्दन पोहऱ्या वळवी कला वाणिज्य व श्री विष्णु कृष्ण कुलकर्णी विज्ञान महाविद्यालय धडगाव महाविद्यालयाचे रासेयो विभागाचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर उमराणी बु.येथे सुरू आहे.शिबिरादरम्यान वनराई बंधारा साकारण्यात आला.

शिबीरादरम्यान उमराणी बु. येथील वल नदीवर वनराई बंधारा बांधण्यात आला. वनराई बंधारा बांधण्यामध्ये कृषी सहाय्यक वामन पावरा, विशाल पावरा, जगदीश पावरा यांनी सहाकार्य केले.

या बंधाऱ्यासाठी ३०० गोण्याचा वापर झाला. या वनराई बंधाऱ्यामुळे मोठ्या प्रमाणावर पाणी साठविले जाणार आहे. या बंधाऱ्याचा फायदा उन्हाळ्यामध्ये गावातील लोकांसाठी, शेतीसाठी व पिण्याच्या पाण्यासाठी आणि विशेषतः गुरांना पाणी पिण्यासाठी होणार आहे. हा बंधारा बांधण्यासाठी विशेषतः राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सुनील शिंदे आणि राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांनी मेहनत घेतली.

रिपोर्टर
मंगेश वी.वळवी
तेलखेडी ता. धडगाव (मो.८२७५२५२२३२)

सकाळ

# उमराणी बुद्रुकला श्रमसंस्कार शिबिर

धडगाव, ता. ३ : राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे बालविवाह जनजागृती व्याख्यान, महाराज जनार्दन पोहऱ्या वळवी कला, वाणिज्य व श्री विष्णू कृष्ण कुलकर्णी विज्ञान महाविद्यालय, धडगाव, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर उमराणी बुद्रुक येथे सुरू आहे.

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त 'बालविवाह एक सामाजिक समस्या' या विषयावर विठ्ठल कदम (माजी अध्यक्ष, बालकल्याण समिती, नंदुरबार) यांनी सहभागी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकाशी संवाद केला. विठ्ठल कदम यांनी विद्यार्थ्यांना बालविवाह प्रतिबंधची प्रतिज्ञा दिली. व्याख्यानासाठी कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सुनील शिंदे यांनी परिश्रम घेतले. प्राचार्य संजय गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली व्याख्यान झाले. या वेळी जनजागृती रॅली काढण्यात आली.

# रासेयो'च्या विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिरात आरोग्य तपासणी



**धडगाव :** येथील महाराज जनार्दन पोहऱ्या वळवी कला वाणिज्य व श्री विष्णु कृष्ण कुलकर्णी विज्ञान महाविद्यालयाच्या 'रासेयो' विभागाचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर उमराणी बु. येथे सुरू आहे. या शिबिरामध्ये प्राचार्य संजय गायकवाड यांच्या मार्गदर्शनाने विविध उपक्रम राबविले जात असून २९ जानेवारी रोजी रोहित ऑप्टिकल धडगाव यांच्यातर्फे नेत्र तपासणी शिबिर घेणयात आले. यावेळी १०० रुग्णांनी लाभ घेतला. यामध्ये ८ रुग्णांना मोतीबिंदू असून त्यांच्यावर नंदुरबार येथील कांतालक्ष्मी शहा नेत्र रुग्णालयात मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याचे रोहिदास पावरा यांनी सांगितले. ३१ जानेवारी रोजी धनाजे 'पीएससी'द्वारे आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिराचा १५० लोकांनी लाभ घेतला. तसेच १ फेब्रुवारी रोजी प्राण्यांचे आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरात डॉ. निलेश जोगदंड, डॉ. राजपाल पावरा यांच्या मार्गदर्शनाने डॉ. दिनेश वळवी, डॉ. कलावती पावरा, डॉ. गोपाल बडगुजर, वर्षा गवळी, राकेश पावरा, प्रवीण ब्राह्मणे, सुरेखा परमार, आरती गवळी, मंगला सोळंकी व राहुल पावरा यांनी तपासणी केली. शिबिर यशस्वीतेसाठी कार्यक्रम अधिकारी डॉ. सुनील एकनाथ शिंदे यांच्यासह सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, आपसिंग पावरा, विशाल पावरा, जगदीश पावरा यांनी परिश्रम घेतले. तरुण भारत दि. 06/02/2023

जळगाव
तरुण भारत

□□□□□□□ | 2023-02-04 | Page- 2
epaper.tarunbharatjalgaon.com

# उमराणी बु. येथे 'रासेयो' शिबिरात बालविवाह जनजागृती



**धडगाव :** कवयत्री बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव संलग्न येथील महाराज जे.पी. वळवी कला, वाणिज्य आणि श्री विष्णू कृष्ण कुलकर्णी विज्ञान महाविद्यालयाच्या 'रासेयो' विभागाचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर उमराणी बु. येथे सुरू आहे. यामध्ये विविध उपक्रम राबविले जात असून शुक्रवारी, ३ रोजी 'बालविवाह एक सामाजिक समस्या' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. प्रमुख व्याख्याते म्हणून विठ्ठल कदम (माजी अध्यक्ष बालकल्याण समिती, नंदुरबार) यांनी सहभागी विद्यार्थ्यांना याविषयी माहिती दिली. तसेच बालविवाह प्रतिबंधची प्रतिज्ञा दिली.

यावेळी उमराणी बुद्रुकमध्ये जनजागृतीपर रॅली देखील काढण्यात आली. कार्यक्रमाचे उद्घाटन ज्येष्ठ प्रा. आर. जी. पवार व निवृत्त बँक अधिकारी आपसिंग पावरा यांच्या हस्ते करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य संजय गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्मक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा.डॉ. सुनील शिंदे, प्रा.डॉ. अशोक राठोड, प्रा. कल्पना साळवे यांनी परिश्रम घेतले. यावेळी प्रा.डॉ. विजय, प्रा.डॉ. एम. एच. पाटील, प्रा. अनिल शिंदे उपस्थित होते.

Powered by iDocuments

# उमराणी बु. येथे 'रासेयो' विभागातर्फे बालविवाह जनजागृती

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३, नंदुरबार :** कवयत्री बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव संलग्न महाराज ... .. वळवी कला, वाणिज्य आणि श्री विष्णू कृष्ण कुलकर्णी विज्ञान महाविद्यालय धडगाव. 'रासेयो' विभागाचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर उमराणी बु. येथे सुरू आहे. यामध्ये विविध उपक्रम राबविले जात असून शुक्रवारी, ३ रोजी 'बालविवाह एक सामाजिक समस्या' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. प्रमुख व्याख्याते म्हणून विठ्ठल कदम (माजी अध्यक्ष बालकल्याण समिती, नंदुरबार) यांनी सहभागी विद्यार्थ्यांना सदर विषयी माहिती दिली.



तसेच बालविवाह प्रतिबंधची प्रतिज्ञा दिली. यावेळी उमराणी बुद्रुकमध्ये जनजागृतीपर रॅली देखील काढण्यात आली. कार्यक्रमाचे उद्घाटन ज्येष्ठ प्रा. आर. जी. पवार व निवृत्त बँक अधिकारी आपसिंग पावरा यांच्या हस्ते करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य संजय गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्मक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा.डॉ. सुनील शिंदे, प्रा.डॉ. अशोक राठोड, प्रा. कल्पना साळवे यांनी परिश्रम घेतले. यावेळी प्रा.डॉ. विजय, प्रा.डॉ. एम. एच. पाटील, प्रा. अनिल शिंदे उपस्थित होते.

**शिबिरामध्ये प्रश्नमंजुषा उपक्रम**

शिबिरामध्ये प्रश्नमंजुषा हा नवीन उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये काही प्रश्न गावातील व्यवस्थेचे, गावाचे रस्ते, कॉलेज-हॉस्टेलमधील व्यवस्था, वैयक्तिक, आरोग्य, परंपरा, अंधश्रद्धा, करिअर, व्यक्तीमत्व सुधारणा, बालविवाह, जंगल तोड, व्यसन. असे विविध प्रश्न यावेळी घेण्यात आले.

**हा उपक्रम का?**

दुर्गम भागातील आदिवासी विद्यार्थी बोलायला लाजतात. त्यांच्यामधील असलेले प्रश्न ते लिखित स्वरूपात द्यावे, म्हणून हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी एकूण ४७ प्रश्न विद्यार्थ्यांनी लिखित स्वरूपात उपस्थित केले. या प्रश्नांची उत्तरे विठ्ठल कदम, प्रा.आर.जी. पवार यांनी दिली.

जळगाव तरुण भारत
Main Edition | 2023-02-09 | Page- 7
epaper.tarunbharatjalgaon.com

## गाव शिवार वार्ता...

# विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचा निरोप समारंभ उत्साहात

**धडगाव :** येथील महाराज जनार्दन पोहऱ्या वळवी कला वाणिज्य व श्री



विष्णू कृष्ण कुलकर्णी विज्ञान महाविद्यालयाच्या 'रासेयो' विभागाचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचा निरोप  उमराणी बुद्रूक येथे नुकताच झाला. यावेळी उत्कृष्ट स्वयंसेवकांना मान्यवरांच्या हस्ते विविध पारितोषिक देण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्रा.एन.पी.विभांडीक. तर प्रमुख पाहुणे म्हणून वनविभागतर्फे मनीषा तीरमाली, प्राचार्य संजय गायकवाड, प्रा. शिवाजी पावरा, अपसिंग पावरा, प्रा.आर.जी.पवार यांच्यासह सरपंच आशा पावरा, फत्तेसिंग पावरा, तानाजी पावरा, पोलीस पाटील, विशाल पावरा, जगदीश पावरा आदी उपस्थित होते. प्रा.एन.पी.विभांडीक यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात एन.एस. एसच्या सर्व स्वयंसेवकांना सात दिवसीय विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल शुभेच्छा दिल्या. सात दिवशीय शिबिरामध्ये नेत्र तपासणी, आरोग्य तपासणी व प्राण्याचे लसीकरण हे शिबिर झाले. जनजागृतीपर पटनाट्य सादर करणार आले. यावेळी उत्कृष्ट स्वयंसेवकांना मान्यवरांच्या हस्ते विविध पारितोषिक देण्यात आले. त्यामध्ये उत्कृष्ट स्वयंसेवक निलेश वळवी, उत्कृष्ट स्वयंसेविका प्रियंका पाडवी, उत्कृष्ट ग्रुप म्हणून भगवान बिरसा मुंडा व व्यसनमुक्ती हे पटनाट्य सर्वोत्कृष्ट म्हणून निवडण्यात आले. 'रासेयो' विभागाकडून रोख रक्कम बक्षीस म्हणून देण्यात आली. तसेच राशीमा फाउंडेशन अध्यक्ष प्रा. शिवाजी पावरा यांच्याकडून इंग्रजी व्याकरण पुस्तक सप्रेम भेट देण्यात आलं. सात दिवस चाललेल्या या शिबिरात प्रास्ताविक प्रा. डॉ सुनील शिंदे यांनी केली तर समारंभात सूत्रसंचालन प्रा.अशोक राठोड, आभार प्रा. कल्पना साळवे यांनी मानले. शिबिर यश्ववीतेसाठी सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, आपसिंग पावरा, विशाल पावरा. जगदीश पावरा यांनी सहकार्य केले.

Powered by iDocuments

दै.अक्षराज ०६ फेब्रुवारी २०२३.pdf

# 'रासेयो'च्या विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिरात नेत्र तपासणी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५ धडगाव (नंदुरबार)** : येथील महाराज जनार्दन पोहऱ्या वळवी कला वाणिज्य व श्री विष्णु कृष्ण कुलकर्णी विज्ञान महाविद्यालयाच्या 'रासेयो' विभागाचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर उमराणी बु. येथे सुरू आहे. या शिबिरामध्ये प्राचार्य संजय गायकवाड यांच्या मार्गदर्शनाने विविध उपक्रम राबविले जात असून २९ जानेवारी रोजी रोहित ऑप्टिकल धडगाव यांच्यातर्फे

नेत्र तपासणी शिबिर घेणयात आले. यावेळी शंभर रुग्णांनी लाभ घेतला.

यामध्ये आठ रुग्णांना मोतीबिंदु असून त्यांच्यावर नंदुरबार येथील कांतालक्ष्मी शहा नेत्र रुग्णालयात मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याचे रोहिदास पावरा यांनी सांगितले. ३१ जानेवारी रोजी धनाजे 'पीएससी'द्वारे आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिराचा १५० लोकांनी लाभ घेतला. तसेच १ फेब्रुवारी रोजी प्राण्यांचे आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरात डॉ. निलेश जोगदंड, डॉ. राजपाल पावरा यांच्या मार्गदर्शनाने डॉ. दिनेश वळवी, डॉ. कलावती पावरा, डॉ. गोपाल बडगुजर, वर्षा गवळी, राकेश पावरा, प्रवीण ब्राह्मणे, सुरेखा परमार, आरती गवळी, मंगला सोळंकी व राहुल पावरा यांनी तपासणी केली.

शिबिर यशस्वीतेसाठी कार्यक्रम अधिकारी डॉ. सुनील एकनाथ शिंदे यांच्यासह सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, आपसिंग पावरा, विशाल पावरा व जगदीश पावरा यांनी परिश्रम घेतले.




# विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचा निरोप समारंभ उत्साहात

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि. ०८, धडगाव (नंदुरबार)** : धडगाव येथील महाराज जनार्दन पोहऱ्या वळवी कला वाणिज्य व श्री विष्णु कृष्ण कुलकर्णी विज्ञान महाविद्यालयाच्या 'रासेयो' विभागाचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचा निरोप समारंभ उमराणी बु.येथे नुकताच संपन्न झाला. यावेळी उत्कृष्ट स्वयंसेवकांना मान्यवरांच्या हस्ते विविध पारितोषिक देण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्रा.एन. पी.विभांडीक. तर प्रमुख पाहुणे म्हणून वन विभागतर्फे मनीषा तीरमाली, प्राचार्य संजय गायकवाड, प्रा. शिवाजी पावरा, अपसिंग पावरा, प्रा.आर.जी.पवार यांच्यासह सरपंच आशाताई पावरा, फत्तेसिंग पावरा, तानाजी पावरा, पोलीस पाटील, विशाल पावरा, जगदीश पावरा आदी उपस्थित होते.

प्रा.एन.पी.विभांडीक यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात एन.एस. एसच्या सर्व स्वयंसेवकांना सात दिवसीय विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल शुभेच्छा दिल्या. सात दिवशीय शिबिरामध्ये नेत्र तपासणी, आरोग्य तपासणी व प्राण्याचे लसीकरण हे शिबिर संपन्न झाले.




जनजागृती पर पटनाट्य सादर करणार आले. यावेळी उत्कृष्ट स्वयंसेवकांना मान्यवरांच्या हस्ते विविध पारितोषिक देण्यात आले. त्यामध्ये उत्कृष्ट स्वयंसेवक निलेश वळवी, उत्कृष्ट स्वयंसेविका प्रियंका पाडवी, उत्कृष्ट ग्रुप म्हणून भगवान बिरसा मुंडा व व्यसनमुक्ती हे पटनाट्य सर्वोत्कृष्ट म्हणून निवडण्यात आले. 'रासेयो' विभागाकडून रोख रक्कम बक्षीस म्हणून देण्यात आली. तसेच राशीमा फाउंडेशन अध्यक्ष प्रा. शिवाजी पावरा यांच्याकडून इंग्रजी व्याकरण पुस्तक सप्रेम भेट देण्यात आलं. ७ दिवस चाललेल्या या शिबिरात प्रास्ताविक प्रा. डॉ सुनील शिंदे यांनी केली तर समारंभात सूत्रसंचालन प्रा.अशोक राठोड, आभार प्रा. कल्पना साळवे यांनी मानले. शिबिर यश्स्वीतेसाठी सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, आपसिंग पावरा, विशाल पावरा, जगदीश पावरा यांनी सहकार्य केले.

# उमराणी बुद्रुकला शिबिराचा समारोप

**धडगाव :** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव व महाराज. ज. पो. वळवी कला, वाणिज्य व श्री. वि. कृ. कु. विज्ञान महाविद्यालय धडगाव, राष्ट्रीय सेवा योजना विभाग एककाद्वारे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचा समारोप उमराणी. बू. येथे करण्यात आला. महाविद्यालयाचे प्रा. एन. पी. विभांडिक, मनीषा तीरमाली (वन विभाग), प्राचार्य संजय गायकवाड, प्रा. शिवाजी पावरा, अपसिंग पावरा, प्रा. आर. जी. पवार, सरपंच आशा पावरा, फत्तेसिंग पावरा, तानाजी पावरा, पोलिस पाटील, विशाल पावरा, जगदीश पावरा आदी उपस्थित होते. स्वयंसेवकांना विविध पारितोषिक देण्यात आले. यात नीलेश वळवी, प्रियंका पाडवी यांचा समावेश होता. उत्कृष्ट ग्रुप म्हणून भगवान बिरसा मुंडा या ग्रुपची निवड करण्यात आली. विजेत्यांना राशीमा फाउंडेशन अध्यक्ष प्रा. शिवाजी पावरा यांच्याकडून इंग्रजी व्याकरण पुस्तक देण्यात आले. या शिबिरामध्ये मेडिटेशन प्रा. आर. जी. पवार यांनी घेतले, ॲरोबिक्स व्यायाम राकेश पावरा यांनी घेतले. योगासने महेश कोळपकर यांनी घेतले. आपत्ती व्यवस्थापनाचे प्रात्यक्षिक नीलेश पावरा यांनी केले. प्रा. डॉ. बी. जी. पवार, प्रा. डॉ. डी. व्ही. पाटील प्रा. डॉ. मनोहर पाटील. प्रा. डॉ. हरिभाऊ पवार, प्रा. डॉ. विजयकुमार, प्रा. अनिल शिंदे, हर्षद पाडवी, योगेश पाटील आदी उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. डॉ. सुनील शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अशोक राठोड यांनी तर आभार प्रा. कल्पना साळवे यांनी मानले.

सकाळ दि. 11/02/2023

राधेश्याम कुलथे
(९७६३९१६७६६)

लोकमत

# उमराणी येथे हिवाळी श्रमसंस्कार शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

**ब्राह्मणपुरी :** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव व महाराज. ज.पो. वळवी कला, वाणिज्य व श्री. वि. कृ. कु. विज्ञान महाविद्यालय धडगावच्या राष्ट्रीय सेवा योजना एककाद्वारे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचा समारोप उमराणी बुद्रूस येथे झाला.

अध्यक्षस्थानी प्रा. एन. पी. विभांडिक होते. प्रमुख पाहुणे म्हणून वनविभागाच्या मनीषा तीरमाली, प्राचार्य संजय गायकवाड, प्रा.शिवाजी पावरा, अपसिंग पावरा, प्रा. आर. जी. पवार उपस्थित होते. यावेळी सरपंच आशा पावरा, फत्तेसिंग पावरा, तानाजी पावरा, पोलिस पाटील, विशाल पावरा, जगदीश पावरा व ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. प्रा. एन. पी. विभांडिक यांनी मनोगतात एन.एस.एस.च्या सर्व स्वयंसेवकांना सात दिवसीय शिबिर यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल शुभेच्छा दिल्या व शिबिरातील सर्व कार्य पूर्ण झाले असे जाहीर केले.

निरोप समारंभामध्ये विविध पारितोषिक देण्यात आले. त्यामध्ये उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून नीलेश वळवी, उत्कृष्ट स्वयंसेविका प्रियंका पाडवी यांना २०० रुपये आणि टी-शर्ट बक्षीस म्हणून देण्यात आले. उत्कृष्ट ग्रुप म्हणून भगवान बिरसा मुंडा या ग्रुपची निवड करण्यात आली व त्यांना ५०० रुपये रोख रक्कम बक्षीस म्हणून देण्यात आले.

शिबिरामध्ये प्रत्येक दिवशी जनजागृतीपर पथनाट्य गावकऱ्यांसमोर सादर करण्यात आले. त्यातील व्यसनमुक्ती हे पथनाट्य सर्वोत्कृष्ट म्हणून निवडण्यात आले. त्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून ५०० रुपये रोख रक्कम बक्षीस म्हणून देण्यात आली. सर्व विजेत्यांना राशीमा फाउंडेशन अध्यक्ष प्रा.शिवाजी पावरा यांच्याकडून इंग्रजी व्याकरण पुस्तक भेट देण्यात आले.

या शिबिरामध्ये मेडिटेशन प्रा.आर.जी. पवार यांनी घेतले आणि एरोबिक्स एक्धरसाइज राकेश पावरा यांनी घेतल्या आणि योगासने महेश कोळपकर यांनी घेतले. आपत्ती व्यवस्थापनचे प्रात्यक्षिक सादर करून नीलेश पावरा यांनी माहिती दिली. या कार्यक्रमासाठी प्रा.डॉ. बी. जी. पवार, प्रा.डॉ .डी. व्ही. पाटील, प्रा. डॉ. मनोहर पाटील. प्रा.डॉ. हरिभाऊ पवार, प्रा. अनिल शिंदे, हर्षद पाडवी, योगेश पाटील उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा.डॉ. सुनील शिंदे यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अशोक राठोड तर आभार प्रा. कल्पना साळवे यांनी मानले. प्राचार्य संजय गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर झाले.

Hello Nandurbar
Page No. 3 Feb 15, 2023
Powered by: erelego.com